**प्रेस नोट ता.३०/०७/२०२३**

# चिखली पोलीस स्टेशनची वडोदरा गुजरात येथे कारवाई रावण टोळीतील मोका मधिल फ़रारी आरोपीस ठोकल्या बेडया रावण टोळीला मोठा झटका

पिंपरी चिंचवड शहरामध्ये गुन्हेगारी टोळ्याचा समुळ बिमोड करण्याच्या पोलीस आयुक्ताच्या आदेशानुसार २०१७ पासुन पोलीस आयुक्तालयात धुडगुस घालणा-या रावण गॅगच्या विरोधात पोलीसांनी धडक मोहिम सुरु केलेली होती. आत्तापर्यन्त या कुप्रसिदध गॅगच्या वेगवेगळ्या ठिकाणच्या मोरक्यावर १० मोका अन्वये कारवाया केलेल्या असुन सर्व आरोपी सध्या येरवडा कारागृहात जेरबंद आहेत.

चिखली परीसरात याच टोळीच्या करण रतन रोकडे व मुंग्या उर्फ़ रुतिक रतन रोकडे या भावानी आपली स्वतंत्र टोळी निर्माण करुन दहशत निर्माण केलेली होती. या दोघाच्या टोळी विरोधात आत्तापर्यन्त खुन, खुनाचा प्रयत्न, जबरी चो-या, कोयत्याचा व अग्निशस्त्राचा वापर करुन जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत असे एकुण २१ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल झालेले होते. यापुर्वीही करण रोकडे याच्यावर मोका अंतर्गत कारवाई केलेली होती तो सध्या जामिनावर होता. तर त्याचा भावु मुंग्या उर्फ़ रुतिक रतन रोकडे याच्यावर सन २०२१ मध्ये मोका अंतर्गत कारवाई केली असता त्यानी दहशतीचे जोरावर फ़िर्यादीस फ़ितुर करुन मोकामधुन त्यांची सुटका करुन घेतलेली होती. त्यानंतर त्यास मुंबई येथे तडीपार करण्यात आलेले होते. परिसरात त्यांचे वर्चस्व कायम राहावे म्हणुन त्यांनी नियोजनबदध पदधतीने दि.२२.०५.२०२३ रोजी दुपारी दोन वाजता चिखली कमानीसमोर भर चौकात गोळ्या झाडून सोन्या तापकीर नावाच्या २१ वर्षाच्या मुलाची निर्घुणपणे हत्या केलेली होती. गुन्हयाचा कट करुन त्यानुसार त्यांनी मध्य प्रदेशातुन पिस्टल विकत आणली होती. टोळीचा प्रमुख करण रोकडे याने त्याप्रमाणे सोन्या पानसरे व सिद्धार्थ कांबळे याना पिस्टल चालविण्याचे प्रशिक्षण दिले. तसेच त्याच्या मदतीला रिंकु यादव व मानव रोकडे यांना वॉचर म्हणुन ठेवुन गुन्हयाचा नियोजनबदध कटानुसार तो गोवा येथे निघुन गेला तर त्याचा भाऊ मुंग्या उर्फ़ रुतिक रोकडे हयास गोवंडी, मुंबई येथे तडीपार केलेले असल्याने तो मुंबई येथे निघुन गेलेला होता. तर कटातील सहभागी असणारा तडीपार आरोपी सचिन गायकवाड हा सातारा येथे निघुन गेला होता.नियोजनानुसार घटना घडली त्यावेळेस आपण पुण्यात नव्हतो हे दाखविण्यासाठी घटनेच्या वेळेस ते पुण्यापासुन दुर असणा-या गोवा, भांडुप पोलीस स्टेशन, सातारा पोलीस स्टेशन येथील सिसिटिही कॅमे-याच्या खाली थाबुन राहिलेले होते. तसेच त्यांचे वापरते मोबाईल हेही त्यांनी त्याच्या घरी चालु ठेवुन पोलीसांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे पुराव्याची लिंक जोडणे व त्याचा गुन्हयाचे कटातील सहभाग निष्पन्न करणे पोलीसासाठी मोठे अव्हान होते. आरोपी वांरवार त्याची राहण्याची ठिकाणे बदलत होते. मोबाईल सिम कार्ड दररोज बदलत होते. तसेच हॉटस ॲप, इंस्टाग्राम, पफ़ जी सारख्या सोशल मेडीयाचा वापर संपर्कासाठी करत होते त्यामुळे त्याचा शोध घेणे पोलीसांना अवघड जात होते.

गुन्हा केल्यानंतर गोळीबार करणारे आरोपी सातारा येथे तडीपार आरोपी सचिन गायकवाड याच्याकडे गेलेले होते तेथुन त्याना अटक करण्यात आली. तर मुख्य सुत्रदार आरोपी हे पळुन प्रथम गोवा नंतर सातारा, बारामती, वडोदरा, मध्य प्रदेश, मथुरा, शेवटी नेपाळ बोर्डरवर मधुबन उत्तर प्रदेश इतपर्यन्त गेलेले होते. पोलीसांनी त्याचा पाठलाग शेवटपर्यन्त करुन शेवटी ते नेपाळ बार्डर जवळ मधुबन, उत्तर प्रदेश या ठिकाणी नेपाळमध्ये पळुन जाण्याच्या तयारीत असताना गुंडा विरोधी पथकाचे स.पो.नि. हरिष माने व पथकाने त्याना मोठया जिगरीने ताब्यात घेतले.

तरिही गुन्हयाचे कटात सहभागी असणारा आरोपी कपिल उर्फ़ विजय दिपक लोखंडे हा गुन्हया घडल्यापासुन फ़रारच होता. प्रथम त्याचे लोकेशन तडीपार आरोपी सचिन गायकवाड यांचे सोबत सातारा परिसरात आलेले होते. त्यानंतर पाटस व नंतर सिन्नर व शेवटचे लोकेशन त्याचे राहते घरी वडॊदरा गुजरात येथे आलेले होते. त्यानुसार एक पोलीस पथक वडोदरा गुजरात येथे पाठविले असता तो तेथुन पळुन जाण्यात यशस्वी झालेला होता.तेव्हापासुन चिखली पोलीस स्टेशनचे पोलीस त्याच्या मागावर होते.

दि.२८.०७.२०२३ रोजी कपिल लोखंडे याने इंस्ट्राग्राम वरुन चिखली परीसरात राहणारी त्यांचे मैत्रीणीला संपर्क केल्याचे पोलीसाचे तात्रीक विश्लेषणात दिसुन आले.चिखली पोलीस स्टेशनचे पोलीसांनी तात्काळ त्याच्या मैत्रीस ताब्यात घेवुन तिच्या माध्यमातुन पाहिजे आरोपी कपिल लोखंडे याचाशी संपर्क चालु ठेवुन पोलीस उप निरीक्षक बारावकर यांचे पथक त्यानुसार पाठवुन त्याचा माघ काढत वडोदरा, गुजरात येथे जावुन तेथील स्थानिक मकरपुरा पोलीस स्टेशनची मदत घेवुन त्यास ताब्यात घेतलेले आहे.

अश्या प्रकाराने दाखल गुन्हयात एकुण १२ आरोपींना अटक करुन त्याच्याविरोधात मोका अंतर्गत कारवाई करुन चिखली पोलीस ठाण्याचे पोलीसांनी चिखली परीसरातील रावण गॅगची दहशत मोडीत काढलेली आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त श्री. विनोय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, अतिरीक्त पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप आयुक्त डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त श्री. पदमाकर घनवट सो. याच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ट पोलीस निरीक्षक, श्री. ज्ञानेश्वर काटकर, पो.नि. भानुदास बर्गे, स.पो.नि. तोफ़िक सय्यद, पोलीस उप निरीक्षक पुजारी, कुमटकर, बारवकर, सहा. पो. उप नि वडेकर, पो.ह. ९६२ नागरे, पो.ह. २९३१ तारळकर, पो.ह.११३३ साकोरे, पो.ह.४१४ जाधव, पो.ना. १८५६ पिंजारी व पो.शि.२९१५ केदार पथकाने केलेली आहे. विशेष तात्रीक सहाय्य नागेश माळी यांनी केलेले आहे.

(डॉ, काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,
परीमंडळ-२, पिंपरी चिंचवड